गुरूवार
३० जुलै २०२६

वर्ष १९ वे
अंक - १८३
पाने - ६
किंमत - ४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

# Km hospital Sangamner

महाराष्ट्र शासन · MJPJAY · PM-JAY




एकत्रित आयुष्मान भारत
प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

आजच आपले आयुष्मान कार्ड बनवा.

शिधापत्रिका सह अंगीकृत रुग्णालयाला भेट द्या

या योजनेअंतर्गत येणाऱ्या आजारांवर मोफत सुविधा उपलब्ध

अत्याधुनिक वैद्यकीय सेवा माफक दरात- संगमनेर येथेच

सर्व हेल्थ इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा आपल्या सेवेत

## 105 बेड्स । तज्ञ डॉक्टर्स । अत्याधुनिक सुविधा

▪ हृदय विकार ▪ समर्पित स्त्रीरोग विभाग ▪ अस्थिरोग ▪ अपघात विभाग ▪
▪ मूत्रविकार ▪ सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया ▪ मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया ▪ लॅपरोस्कोपिक सर्जरी ▪
▪ गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया ▪ जनरल मेडिसिन ▪ छातीचे विकार ▪ पॅरालीसीस ▪ मधुमेह विकार ▪
▪ एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी ▪ रोबोटिक सर्जरी ▪ अत्याधुनिक कॅथ लॅब ▪ मॉड्युलर ऑपरेशन थिएटर ▪
▪ डायलिसिस ▪ प्लास्टिक सर्जरी ▪ सिटी स्कॅन ▪ सोनोग्राफी विभाग ▪

- संपर्क -
02425 - 226532/33
99532 99532

## अनुभवी आणि तज्ञ डॉक्टर्स

डॉ. राजेंद्र म्हस्के
( प्रमुख वैद्यकीय अधिकारी )

डॉ. संदीप बोरले
M.B.B.S., M.S. (Ortho)
( एम. एस. ऑर्थोपेडिक सर्जन )

डॉ. सुशांत गिते
M.B.B.S., D.N.B. (Medicine)
( जनरल फिजिशियन व डायबेटॉलॉजिस्ट )

डॉ. बाळासाहेब मेहेत्रे
M.B.B.S., M.S.
( स्त्रीरोग तज्ज्ञ )

डॉ. सखाराम घनकुटे
M.B.B.S., D.A.
( भुलतज्ज्ञ )

डॉ. सौ. रूपाली शिंदे
M.B.B.S., D.A.
( भुलतज्ज्ञ )

डॉ. राहुल गुट्टे
M.B.B.S., M.S., D.M., Cardiologist
( हृदयरोगतज्ज्ञ )

डॉ. अनुप्रित सातपुते
M.B.B.S., M.S.
( जनरल लॅप्रोस्कोपिक सर्जन )

डॉ. चंद्रकांत तांबे
( कन्सल्टंट डेंटल सर्जन )

डॉ. उदयकुमार बढे
M.B.B.S., M.S., M.C.H.
( न्यूरो अँड स्पाईन सर्जन )

डॉ. वैभव थोरात
M.B.B.S., M.S., M.C.H.
( मुत्रविकार तज्ज्ञ )

डॉ. संजय वराडे
D.M. Neurology
( न्यूरो फिजिशिअन )

डॉ. पूनम माळी
M.B.B.S.
( रेडिओलॉजिस्ट )

डॉ. कावेरी बढे
M.B.B.S.
( रेडिओलॉजिस्ट )

डॉ. संकेत ताजणे
M.B.B.S.
( रेडिओलॉजिस्ट )

डॉ. हेमंत शिंदे
M.B.B.S. ( रेडिओलॉजिस्ट )

डॉ. राजश्री वाळुंज
( स्त्रीरोगतज्ज्ञ )

डॉ. अमित शिंदे
( स्त्रीरोगतज्ज्ञ )

डॉ. स्वाती म्हस्के
( वैद्यकीय अधिक्षक )

डॉ. सुवर्णा मेहेत्रे
( स्त्रीरोगतज्ज्ञ )

डॉ. विनोद आव्हाड
M.B.B.S., M.D. (Medicine)

डॉ. कोमल बोरले
M.B.B.S.

डॉ. सोनाली गिते
M.S. ( शल्य प्रोक्टोलॉजिस्ट )

डॉ. सुजित मुळे
M.B.B.S., M.D. ( बालरोग तज्ज्ञ )

डॉ. शोभना कोल्हे
( कान, नाक, घसा तज्ज्ञ )

डॉ. गणेश नागुलकर
( मेडिकल ऑफिसर )

डॉ. कैलास मांडे
( मेडिकल ऑफिसर )

डॉ. राजेंद्र म्हस्के
( प्रमुख वैद्यकीय अधिकारी )

श्री. महेश अशोक वाव्हळ
( प्रमुख वैद्यकीय अधिकारी )




सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425-226532/33

24 तास अत्यावश्यक सेवा 99532 99532

पत्ता- सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर, जि. अहिल्यानगर

पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# पुणे विद्यापीठात पदव्यांचा काळा बाजार
## शिक्षण क्षेत्र भ्रष्टाचाराने झाले बेजार

पुणे (वृत्तसंस्था)

ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बनावट पदवी देण्याचे कथित रॅकेट सक्रिय असल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. विद्यापीठातील एका सहाय्यक कक्षाधिकाऱ्याने कोणतीही परीक्षा न देता बीकॉमची पदवी मिळवून देण्याचे आमिष दाखवत लाखोंची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने सत्यशोधन समिती नियुक्त केली आहे.

तक्रारदार महेश कदम यांनी सांगितले की, मुलाच्या शिक्षणासंदर्भात माहिती घेण्यासाठी विद्यापीठात गेल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी तीन लाख रुपयांची मागणी केली. चर्चेनंतर दीड लाख रुपयांवर व्यवहार ठरला असून त्यांनी ऑनलाइन पद्धतीने ७० हजार रुपये दिले.

यानंतर पदवी प्रमाणपत्र दाखविण्यात आले. मात्र, त्यावर २०१४ नंतर बदललेल्या 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ'ऐवजी जुने 'पुणे विद्यापीठ' हे नाव असल्याने संशय निर्माण झाला. तसेच संबंधित विद्यार्थ्याचा कोणताही संबंध नसताना वाडिया महाविद्यालयाच्या नावाने पदवी देण्याची तयारी झाल्याचाही आरोप आहे.

महेश कदम यांनी पुराव्यांसह विद्यापीठाकडे तक्रार केल्यानंतर प्रशासनाने चौकशी सुरू केली आहे. प्रभारी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी समितीचा अहवाल दोन दिवसांत अपेक्षित असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे सांगितले आहे. या प्रकरणामागे मोठे रॅकेट आहे का, याचाही तपास केला जाणार आहे. अद्याप या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झालेला नसला, तरी चौकशी अहवालानंतर पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अकोले नगराध्यक्षपदासाठी चुरस शिगेला
## सोनाली नाईकवाडी आणि वैष्णवी धुमाळ आमनेसामने

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत आता दुरंगी सामना रंगणार आहे. अर्ज माघारीनंतर माजी नगराध्यक्षा सोनाली लक्ष्मीकांत नाईकवाडी आणि वैष्णवी सोमेश्वर धुमाळ यांचे अर्ज कायम राहिल्याने निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. येत्या ३१ जुलै रोजी होणाऱ्या या निवडणुकीत अनुभव आणि नव्या नेतृत्वाची प्रतिष्ठेची लढत पाहायला मिळणार आहे.

अकोले नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदावर यापूर्वी सोनाली नाईकवाडी विराजमान होत्या. काही कारणास्तव त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर बाळासाहेब वडजे यांची नगराध्यक्षपदी निवड झाली होती. मात्र, त्यांच्याविरोधात अविश्वास ठराव मंजूर झाल्याने नगराध्यक्षपद पुन्हा रिक्त झाले. त्यानंतर या पदासाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली.

नगराध्यक्षपदासाठी अर्ज मागविण्यात आल्यानंतर अनेक इच्छुकांनी अर्ज दाखल केले होते. मात्र, छाननी आणि अर्ज माघारीनंतर अंतिम लढत सोनाली नाईकवाडी आणि वैष्णवी धुमाळ यांच्यात निश्चित झाली आहे.


सोनाली नाईकवाडी


वैष्णवी धुमाळ

सोनाली नाईकवाडी यांना यापूर्वी नगराध्यक्ष म्हणून काम करण्याचा अनुभव असून, नगरपंचायतीच्या कारभाराची त्यांना जाण आहे. याच अनुभवाच्या जोरावर त्या पुन्हा एकदा नगराध्यक्षपदाच्या मैदानात उतरल्या आहेत.

दुसरीकडे वैष्णवी धुमाळ यांना माजी आमदार वैभव पिचड यांच्या नेतृत्वाखालील गटाचा पाठिंबा असल्याने ही निवडणूक राजकीयदृष्ट्याही महत्त्वाची ठरत आहे.

या निवडणुकीकडे केवळ नगराध्यक्ष निवडीच्या दृष्टीने न पाहता अकोले तालुक्यातील आगामी राजकीय समीकरणांची दिशा ठरविणारी निवडणूक म्हणून पाहिले जात आहे. विविध गटांकडून संख्याबळाबाबत वेगवेगळे दावे केले जात असले तरी अंतिम निकाल मतदानानंतरच स्पष्ट होणार आहे.

३१ जुलै रोजी होणाऱ्या मतदानातून अकोले नगरपंचायतीच्या नेतृत्वाची पुढील दिशा निश्चित होणार असून, अनुभवी नेतृत्वाला संधी मिळते की नव्या चेहऱ्यावर विश्वास दाखवला जातो, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त संगमनेरमध्ये रामरक्षा पठण, महाआरती व पदाधिकारी नियुक्ती सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त संगमनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक शेजारील आरगडे गल्ली येथील श्री मारुती मंदिरात रामरक्षा स्तोत्र पठण, महाआरती तसेच पदाधिकारी नियुक्तीपत्र वितरणाचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमात संगमनेर तालुक्यातील नवीन व जुन्या शिवसैनिकांना विविध पदांची नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. उत्तर अहिल्यानगर जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना सचिन कोते पाटील यांनी तालुक्यातील ज्येष्ठ शिवसैनिकांच्या कार्याचे कौतुक करत, नवीन व जुन्या शिवसैनिकांना एकत्र आणून संघटना बळकट करण्याचे काम तालुकाप्रमुख अमर कतारी करत असल्याचे सांगितले. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा भगवा झेंडा फडकविण्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

शिवसेना सहसंपर्कप्रमुख दिलीप साळगट व जिल्हा संघटक बोऱ्हाडे यांनीही संघटना अधिक मजबूत करण्यासाठी जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे स्वागत विधानसभा शहरप्रमुख बाळासाहेब घोडके यांनी केले. शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद, तालुकाप्रमुख भीमा पावसे, उपजिल्हाप्रमुख इम्तियाज शेख, सदाशिव हासे, उपजिल्हा संघटक पप्पू कानकाटे, समन्वयक रेवनाथ शिंदे आदींनी प्रमुख मान्यवरांचा सत्कार केला.

यानंतर श्री मारुती मंदिरात जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील यांच्या हस्ते रामरक्षा स्तोत्र पठण व महाआरती करण्यात आली. या धार्मिक कार्यक्रमात शिवसैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लहान मुलांनी साकारलेली प्रभू श्रीराम, माता सीता, लक्ष्मण व बजरंगबली (हनुमान) यांची वेशभूषा. या बालकलाकारांनी महाआरतीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांच्या आकर्षक वेशभूषेमुळे परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली असून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे कौतुक केले. यावेळी उपतालुकाप्रमुख, तालुका समन्वयक, तालुका संघटक, गटप्रमुख, गणप्रमुख, उपशहरप्रमुख, कोअर कमिटीचे अध्यक्ष-उपाध्यक्ष तसेच महिला आघाडीच्या विविध पदांवर अनेक कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली.

उपतालुकाप्रमुख म्हणून निमोण विभागातून पंढरीनाथ घुगे व प्रभाकर गेठे, वडगाव-तळेगावमधून सचिन दिघे व श्यामराव गोडगे, आश्वीमधून हरिभाऊ जोरी व सुभाष गाडेकर, जोर्वेमधून दीपक मुळे व विजय सुतार, संगमनेर खुर्दमधून त्र्यंबक शिंदे व अरुण भालेराव, धांदरफळमधून रामदास दिघे व बाळासाहेब कवडे, घुलेवाडीमधून दत्तात्रय नाईक व दिलीप राऊत, बोटामधून अशोक थोरात व भाऊसाहेब भागवत तसेच साकूरमधून किशोर तरंगे व जनार्दन नागरे यांची नियुक्ती करण्यात आली. तालुका समन्वयक व संघटक म्हणून अनिल गांजवे (उत्तर), अशोक गडाख (दक्षिण), बाबासाहेब शिंदे (संगमनेर-शिर्डी विधानसभा), शिवाजी भाचकर (साकूर विभाग) आणि उत्तमराव ढेरंगे (पठार-बोटा विभाग) यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

कोअर कमिटीच्या नियुक्त्यांमध्ये धांदरफळ-संगमनेर खुर्द-जोर्वे गटाच्या अध्यक्षपदी हरीशभाऊ लांडगे व उपाध्यक्षपदी बाळासाहेब देशमुख, आश्वी-बोटा-साकूर गटाच्या अध्यक्षपदी एकनाथ खेमनर व उपाध्यक्षपदी भाऊसाहेब वराळे, (पान ४ वर)

# देशात युवाशक्तीच राष्ट्र शक्ती
## अण्णा हजारेंकडून तरूणाईला प्रोत्साहन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - युवा शक्ती हीच राष्ट्रशक्ती आहे. आजचे युवक-युवती हेच उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. प्रामाणिकपणा, त्याग आणि राष्ट्रसेवेची जिद्द अंगी बाळगून कार्य केल्यास देश निश्चितच प्रगतीच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचेल, असा प्रेरणादायी संदेश ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी विविध राज्यांतील आयपीएस प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना दिला.

हैदराबाद येथे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या २० आयपीएस प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी ग्रामविकास, जलसंधारण आणि पाणलोट क्षेत्र विकासाच्या यशस्वी मॉडेलचा अभ्यास करण्यासाठी राळेगणसिद्धीला भेट दिली. यावेळी अण्णा हजारे तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धीच्या दुष्काळग्रस्त गावापासून देशभरात आदर्श गाव म्हणून ओळख निर्माण करण्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास उलगडून सांगितला. जलसंधारण, लोकसहभाग, सामूहिक श्रम, ग्रामविकास आणि शाश्वत विकासाच्या संकल्पनेमुळे गावात घडलेले आमूलाग्र परिवर्तन त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. तसेच २०११ मधील भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनातील अनुभव कथन करताना त्यांनी प्रशासनातील पारदर्शकता, प्रामाणिक नेतृत्व आणि जनसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकाऱ्यांनीही प्रशासनातील जबाबदारी, नेतृत्व, लोकांशी संवाद आणि सुशासन या विषयांवर अण्णा हजारेंशी संवाद साधून मार्गदर्शन घेतले.

ADVANCE GOLD SIP SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# संगमनेरमध्ये उद्योजकांसाठी मालपाणी लॉन्स येथे कार्यशाळेचे आयोजन

## ऑनलाइन मार्केटिंग व शासकीय योजनांसंबंधी मार्गदर्शन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सध्याच्या स्पर्धात्मक युगात आपल्या उद्योगाचे मार्केटिंग करताना सूक्ष्म, लघु आणि मध्यम (एमएसएमई) उद्योजकांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा उद्योजकांसाठी विनामूल्य स्वरुपात विशेष शासकीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. गुरूवार, दिनांक ३० जुलै २०२६ रोजी संगमनेर मालपाणी लॉन्सच्या सभागृहात ही कार्यशाळा होणार आहे.

नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएसआयसी), केंद्र सरकारचे एमएसएमई, ओपन नेटवर्क फॉर डिजीटल कॉमर्स (ओएनडीसी), महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, व्हिस्डम एक्स्ट्रा प्रा लि, रोटरी क्लब ाफ संगमनेर, चेनेलियर, स्वयंशक्ती स्त्री उद्यमी फाउंडेशन, यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा होते आहे. या कार्यक्रमात उपस्थित राहणाऱ्या उद्योजकांना 'एमएसएमई टीम' योजनेच्या अंतर्गत विविध बाबींवर मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर उद्योजकांना पूर्णपणे मोफत नोंदणी करता येईल. उत्पादनांच्या योग्य व आकर्षक पॅकेजिंगसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि मदत दिली जाईल. 'बिझनेस-टू-कंझ्युमर' (बी टू सी) आणि 'बिझनेस-टू-बिझनेस' (बी टू बी) मार्केटिंगची मोफत संधी उपलब्ध करून दिली जाईल. विविध व्यावसायिक प्रदर्शनांमध्ये विनामूल्य सहभागी होण्याची संधी मिळेल. ट्रेडमार्क, बारकोड आणि शासकीय अनुदान यांबद्दल सविस्तर माहिती दिली जाईल. या कार्यशाळेत सर्व प्रकारचे मॅन्युफॅक्चरिंग (उत्पादन) आणि सर्व्हिस (सेवा) सेक्टरमधील उद्योजक या योजनेचा आणि कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकतात. या कार्यक्रमासाठी जागा मर्यादित असल्यामुळे नाव नोंदणी आवश्यक आहे. तसेच, कार्यक्रमाला येताना सोबत उद्यम सर्टिफिकेट आणणे बंधनकारक आहे. इच्छुक उद्योजकांनी अधिक माहितीसाठी किंवा नाव नोंदणीसाठी ८४८४८९८४६६, ८४८४९९०५४१, किंवा ९४०३२७८३६६ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# अकोलेत उघड्या गटारीत दुचाकीस्वार कोसळला

## चौथ्यांदा अपघात, तरीही प्रशासनाचे दुर्लक्ष



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले -संगमनेर रस्त्यावरील महालक्ष्मी कॉलनी समोरील रस्त्या लगतच्या उघड्या जम्बो गटारीत संगमनेर कडून अकोलेकडे येणारा दुचाकीस्वार पडला. गटारीच्या या उघड्या खोल खड्ड्यात मोठा पाईप गेलेला असून या पाईप वर पडून तो गटारीत पडला असल्यामुळे सुदैवाने त्याला कोणतीही दुखापत झालेली नाही. तेथे जमलेल्या स्थानिक व्यापारी व नागरिकांनी दोरीच्या साहाय्याने त्याला सुखरूप बाहेर काढले.

तुकाराम भिमाजी साबळे रा. आंभोळ, भवारवाडी हे आपल्या मोटार सायकल वरून अकोलेकडे येत होते. सेंट्रल बँके समोरील उघड्या खोल गटारी जवळ त्यांची दुचाकी स्लिप झाली व ते सात ते आठ फूट खोल असणाऱ्या गटारीत पडले. या धोकादायक गटारीत अशा प्रकारे कोणी पडण्याची ही चौथी वेळ आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला स्थानिक व्यापारी, नागरिक व अकोले नगर पंचायत च्या नगरसेविका शितल अमोल वैद्य यांनी अनेक वेळा सदर गटारीच्या खड्डया भोवती संरक्षक कढडे बसविणेची मागणी केली होती. मात्र आश्वासन देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाने मागील चार वर्षात यासंदर्भात कोणतीही कारवाई केलेली नाही.

राजूर, अकोले, संगमनेर या रस्त्याचे अलीकडेच रुंदीकरन करण्यात आले. मात्र धक्कादायक बाब म्हणजे या रस्ता रुंदी करणाच्या अंदाज पत्रकात शॅम्प्रो ऑफिस समोरील सीडी वर्कची कोणतीही तरतूद केलेली नव्हती. अखेर नागरिक व स्थानिक व्यापारी यांच्या रेट्या नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागाय अधिकऱ्यांनी या ठिकाणी नवीन सीडी वर्क बांधणे बाबत रस्त्याच्या ठेकेदारास सूचना दिल्या होत्या. सदर ठेकेदाराने सीडी वर्क बांधण्याच्या दृष्टीने आरसीसी पाईप आणले असल्याचा दावा उपविभागीय अधिकारी यांनी नगरसेविका शितल वैद्य यांनी १६ नोव्हेंबर २०२२ रोजी पाठवलेल्या पत्रात केला होता. मात्र चार वर्षात न पाईप आले ना सीडी वर्क चे बांधकाम झाले असा स्थानिक नागरिकांचा आरोप आहे. असे किती अपघात झाल्या नंतर किंवा् अपघातात एखाद्याचा जीव गेल्या नंतरच सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार आहे का असा संतप्त सवाल नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# प्रवास एक वर्षांचा, विश्वासाचा ... सेवाभावातून आरोग्याकडे !

## Km (कल्पतरू) मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त



प्रत्येक यशस्वी प्रवासाची सुरुवात एका दृढ संकल्पातून होते. समाजाला आधुनिक, विश्वासार्ह आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यातील आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या ध्येयातून संगमनेर येथे केएम (कल्पतरू) मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलची स्थापना झाली. आज या सेवाप्रवासाला एक वर्ष पूर्ण होत असताना, हजारो रुग्णांनी दाखविलेला विश्वास, त्यांचे आशीर्वाद आणि प्रेम हीच आमच्या कार्याची सर्वात मोठी पावती ठरली आहे.

केएम मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल ही केवळ एक वैद्यकीय संस्था नसून, सात सहकाऱ्यांच्या सामूहिक स्वप्नाचे आणि सेवाभावी विचारांचे साकार रूप आहे. समाजाला दर्जेदार, आधुनिक आणि रुग्णकेंद्रित आरोग्यसेवा मिळावी या उद्देशाने आम्ही सात जणांनी एकत्र येऊन हा प्रवास सुरू केला. आज मागे वळून पाहताना समाधान वाटते की, हे स्वप्न केवळ यशस्वी झाले नाही, तर अनेकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविणारे ठरले आहे.

आज हॉस्पिटलमध्ये १३६ समर्पित कर्मचारी कार्यरत आहेत. अनुभवी डॉक्टर, कुशल नर्सेस, तंत्रज्ञ, प्रशासकीय अधिकारी आणि सहाय्यक कर्मचारी रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देत अहोरात्र कार्यरत आहेत. प्रत्येक रुग्णाला दर्जेदार उपचारांसोबत आत्मीयता, सुरक्षितता आणि विश्वास मिळावा, यासाठी संपूर्ण टीम सातत्याने प्रयत्नशील आहे.

या हॉस्पिटलच्या स्थापनेमुळे केवळ आरोग्यसेवेची गुणवत्ता वाढली नाही, तर १३६ कुटुंबांना स्थिर रोजगार आणि आर्थिक आधार मिळाला आहे. समाजसेवा आणि रोजगारनिर्मिती यांचा सुंदर संगम घडवून अनेक कुटुंबांच्या आयुष्यात स्थैर्य निर्माण करण्याचे भाग्य आम्हाला लाभले आहे. हीच आमच्या प्रथम वर्धापनदिनाची सर्वात मोठी आणि अभिमानास्पद उपलब्धी आहे. गेल्या एका वर्षात ४,६०० हून अधिक रुग्णांनी येथे उपचार घेतले असून १,५३० हून अधिक यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. अचूक निदान, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि अनुभवी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली अनेक जटिल शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. त्यामुळे असंख्य रुग्णांना वेदनामुक्त, निरोगी आणि सक्षम जीवन जगण्याची नवी संधी मिळाली आहे.

विशेषतः अस्थिरोग विभागाने हाडांचे फ्रॅक्चर, सांध्यांचे विकार, अपघातातील गंभीर दुखापती, क्रीडा दुखापती आणि विविध अस्थिरोगांवरील उपचारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अत्याधुनिक उपकरणे, वैज्ञानिक उपचारपद्धती आणि अनुभवी तज्ज्ञांच्या माध्यमातून रुग्णांना जलद आणि परिणामकारक उपचार उपलब्ध करून देण्यात आले.

उपचारांबरोबरच हॉस्पिटलने सामाजिक उत्तरदायित्वही तितक्याच प्रामाणिकपणे जपले आहे. ग्रामीण व दुर्गम भागात आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती कार्यक्रम, गरजू रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांद्वारे समाजापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आला आहे.

या यशस्वी प्रवासामागे आमचे सर्व डॉक्टर, नर्सेस, तंत्रज्ञ, कर्मचारी आणि सहकाऱ्यांचे समर्पित योगदान आहे. त्याचबरोबर आमच्यावर विश्वास ठेवणारे प्रत्येक रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांचे सहकार्य हीच आमच्या कार्याची खरी प्रेरणा आहे. प्रथम वर्धापनदिन हा आमच्यासाठी केवळ उत्सवाचा क्षण नसून, अधिक जबाबदारीने पुढे वाटचाल करण्याची नवी प्रेरणा आहे. आगामी काळात आणखी अत्याधुनिक सुविधा, उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा आणि रुग्णकेंद्रित उपचारांच्या माध्यमातून संगमनेर व परिसरातील नागरिकांच्या आरोग्यसेवेत अधिक मोलाचे योगदान देण्याचा आमचा दृढ संकल्प आहे. विश्वास, गुणवत्ता आणि सेवाभाव या त्रिसूत्रीवर आधारलेली आमची ही आरोग्यसेवा भविष्यातही अधिक व्यापक आणि प्रभावी स्वरूपात सुरू राहील, असा आम्हाला विश्वास आहे.

सर्व रुग्ण, हितचिंतक, सहकारी आणि संगमनेर परिसरातील नागरिकांचे मनःपूर्वक आभार!

**डॉ. संदीप बोरले**
एम.एस. (ऑर्थोपेडिक्स) अस्थिरोग तज्ज्ञ
संचालक, केएम (कल्पतरू) मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल

# ओझर बु सोसायटी चेअरमनपदी भाऊसाहेब सानप तर व्हाईस चेअरमनपदी राहुल खेमनर यांची निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सहकारातून समृद्धीकडे या ब्रीद वाक्या प्रमाणे गावच्या सहकारी संस्थाच्या माध्यमातून सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या ओझर बुद्रुक विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीत माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायटी निवड प्रक्रियेत पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याने गावात उत्सहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडीत चेअरमनपदी भाऊसाहेब कारभारी सानप, तर व्हाईस चेअरमनपदी राहुल तुळशीराम खेमनर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नवीन नेतृत्वाच्या निवडीमुळे सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी, सभासद आणि ग्रामीण भागाच्या विकासाला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निवडीनंतर दोन्ही पदाधिकाऱ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत असून गावातील नागरिक, सभासद, सहकारी क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध सामाजिक संघटनांनी त्यांचे अभिनंदन केले.

भाऊसाहेब कारभारी सानप यांनी यापूर्वीही सहकार क्षेत्रात केलेल्या कामाचा अनुभव लक्षात घेता, त्यांच्या नेतृत्वाखाली सोसायटीची आर्थिक प्रगती, पारदर्शक कारभार आणि शेतकरी हिताच्या योजना अधिक प्रभावीपणे राबवल्या जातील, असा विश्वास सभासदांनी व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे राहुल तुळशीराम खेमनर यांच्या निवडीमुळे तरुण नेतृत्वाला संधी मिळाल्याची भावना व्यक्त होत असून, आधुनिक विचारसरणी आणि विकासाभिमुख दृष्टीकोनातून सोसायटीचे कामकाज अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सोसायटीच्या माध्यमातून कृषी कर्ज वितरण, शेतीपूरक योजना, शासकीय अनुदानांचा लाभ, सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम तसेच ग्रामीण विकासाची अनेक कामे प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. गावातील सर्व घटकांना विश्वासात घेऊन पारदर्शक, लोकाभिमुख आणि विकासकेंद्री कारभार करण्यावर भर दिला जाईल, असेही नवनिर्वाचित चेअरमन भाऊसाहेब सानप व व्हाईस चेअरमन राहुल खेमनर यांनी म्हटले आहे.

# इंजि. तुषार गिते यांचे समाजोपयोगी उपक्रम

## वाढदिवसानिमित्त जि. प. शाळेला प्रिंटरची भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सामाजिक बांधिलकी जपत आणि शिक्षण क्षेत्राला सहकार्य करण्याच्या उद्देशाने गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर व प्रतिष्ठित उद्योजक इंजि. तुषार गिते यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनोशी (ता. संगमनेर) या शाळेला उपयुक्त असा प्रिंटर भेट दिला.

शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजासाठी, विविध उपक्रमांसाठी तसेच कार्यालयीन उपयोगासाठी या प्रिंटरचा मोठा फायदा होणार आहे. वाढदिवसाच्या आनंदाच्या निमित्ताने समाजोपयोगी उपक्रम राबवून इंजि. तुषार गिते यांनी शिक्षण क्षेत्राप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी शाळेच्या शिक्षिका श्रीमती मुटकुळे उषा भास्कर यांनी प्रिंटर भेटीबद्दल इंजि. तुषार गिते व उपस्थित मित्र परिवाराचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या सहकार्यामुळे ग्रामीण भागातील शाळांना मोठे बळ मिळते व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मदत होते.

याप्रसंगी बाळासाहेब गिते, चेतन आव्हाड, संतोष गिते, मयुर गायकवाड, प्रतीक गायकवाड, अमोल कोल्हे, अभिजीत नवले, सुशांत गुंजाळ, सुनील सातपुते आदी मित्र परिवार उपस्थित होता.

शिक्षणासाठी दिलेले हे योगदान समाजातील इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत असून, वाढदिवस साजरा करण्याचा एक आदर्श उपक्रम म्हणून या भेटीकडे पाहिले जात आहे.

# अवैध देशी दारू जप्त

संगमनेर - तालुक्यातील झरेकाठी गावातील पाण्याच्या टाकीजवळ देशी दारूची बेकायदा वाहतूक करणाऱ्या एका युवकाला पकडून आश्वी पोलिसांनी सुमारे ५२ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत देशी दारूच्या बाटल्यांसह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली दुचाकीही जप्त करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत अण्णासाहेब आहेर (रा. झरेकाठी) हा सोमवारी (दि. २७) रात्री सुमारे ९.५६ वाजण्याच्या सुमारास झरेकाठी गावातील पाण्याच्या टाकीजवळ गस्तीदरम्यान अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करताना मिळून आला. त्याच्याकडून ५० हजार रुपयांची दुचाकी (क्र. एमएच.१७, डीडी. ९४३२) आणि देशी दारूच्या २६ सीलबंद बाटल्या (किंमत २,०३० रुपये) असा एकूण ५२ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## संपादकीय...

# खाकीवरील प्रश्न

लोकशाही व्यवस्थेत पोलीस दल हे केवळ कायद्याची अंमलबजावणी करणारे यंत्र नसून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वासाचा प्रमुख आधारस्तंभ आहे. समाजात गुन्हेगारीला आळा घालणे, कायदा-सुव्यवस्था राखणे आणि सामान्य नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही जबाबदारी खाकीवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे पोलिस दलाकडे समाज आदर, विश्वास आणि सुरक्षिततेच्या भावनेने पाहतो. मात्र, जेव्हा याच खाकीवर भ्रष्टाचार, गुन्हेगारांशी संगनमत किंवा सत्तेचा गैरवापर केल्याचे आरोप होतात, तेव्हा केवळ एखाद्या अधिकाऱ्याची प्रतिमा मलिन होत नाही, तर संपूर्ण पोलिस दलावरील जनतेचा विश्वास डळमळीत होतो.

अलीकडील काही घटनांमध्ये पोलिस कर्मचारी गुन्हेगारांना मदत करत असल्याचे आरोप समोर आले आहेत. अशा प्रकारांमुळे कायद्याचे रक्षकच जर कायदा मोडत असतील, तर नागरिकांनी न्यायासाठी कोणाकडे पाहायचे? हा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण होतो. भ्रष्टाचाराची ही काही मोजकी प्रकरणे असली, तरी त्यांचा परिणाम संपूर्ण यंत्रणेवर होतो. हजारो प्रामाणिक अधिकारी-कर्मचारी रात्रंदिवस जीव धोक्यात घालून सेवा बजावत असताना काही भ्रष्ट व्यक्तींमुळे संपूर्ण दलाची प्रतिमा मलीन होते, ही खेदाची बाब आहे. भ्रष्टाचाराची मुळे केवळ आर्थिक लाभापुरती मर्यादित नसतात. राजकीय हस्तक्षेप, अपुरी देखरेख, अंतर्गत शिस्तीचा अभाव, शिक्षा होण्यास होणारा विलंब आणि उत्तरदायित्वाची कमतरता यामुळे अशा प्रवृत्तीला खतपाणी मिळते. काही वेळा वरिष्ठ अधिकाऱ्यांची उदासीनता किंवा दबावामुळे चुकीच्या कृत्यांवर वेळेवर कारवाई होत नाही. त्यामुळे चुकीचे वर्तन करणाऱ्यांचे मनोबल वाढते आणि प्रामाणिक कर्मचाऱ्यांचे मनोबल खच्ची होते. पोलिस दलातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही, बॉडी-वॉर्न कॅमेरे, डिजिटल केस व्यवस्थापन, ऑनलाइन तक्रार निवारण प्रणाली आणि स्वतंत्र अंतर्गत चौकशी यंत्रणा अधिक सक्षम केल्यास गैरप्रकारांना आळा बसू शकतो. प्रत्येक गंभीर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर तातडीने आणि कठोर कारवाई झाली, तर चुकीचा संदेश जाणार नाही आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांनाही न्याय मिळेल. याचबरोबर पोलिस दलातील नैतिक मूल्यांची जपणूकही तितकीच महत्त्वाची आहे. प्रशिक्षणामध्ये कायद्याचे ज्ञान, मानवी हक्क, लोकाभिमुख वर्तन आणि नैतिकतेवर अधिक भर देण्याची गरज आहे. खाकी ही केवळ वर्दी नसून ती समाजाच्या विश्वासाचे प्रतीक आहे, ही भावना प्रत्येक पोलिस कर्मचाऱ्याच्या मनात रुजविणे आवश्यक आहे. सेवा ही अधिकार नसून जबाबदारी आहे, ही जाणीव सातत्याने दृढ केली पाहिजे. नागरिकांचीदेखील या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका आहे. भ्रष्टाचाराची माहिती लपविण्याऐवजी संबंधित पुराव्यांसह सक्षम यंत्रणेकडे तक्रार करणे, चौकशीला सहकार्य करणे आणि कायदेशीर मार्गाने न्याय मिळविण्याचा प्रयत्न करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. समाज आणि प्रशासन यांच्यातील परस्पर विश्वास वाढला, तरच कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम होऊ शकते. तथापि, काही अपवादात्मक घटनांच्या आधारे संपूर्ण पोलिस दलावर अविश्वास दाखविणेही योग्य ठरणार नाही. देशभरातील असंख्य पोलीस अधिकारी आणि कर्मचारी पूर, दहशतवाद, गुन्हेगारी, अपघात आणि विविध संकटांच्या काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता सेवा बजावत असतात. अनेकांनी कर्तव्य बजावताना प्राणांचे बलिदान दिले आहे. त्यामुळे भ्रष्ट व्यक्तींवर कठोर कारवाई करणे जितके आवश्यक आहे, तितकेच प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचे मनोबल वाढविणेही महत्त्वाचे आहे. लोकशाहीत कोणतीही व्यवस्था जनतेच्या विश्वासावरच टिकून असते. पोलिस दलावरील विश्वास कायम राखायचा असेल, तर भ्रष्टाचाराबाबत 'शून्य सहनशीलता' हे धोरण प्रत्यक्ष कृतीत उतरवावे लागेल. गुन्हेगार कोणताही असो-तो सामान्य नागरिक असो किंवा खाकी वर्दीतील कर्मचारी-कायद्यापुढे सर्व समान आहेत, हा संदेश ठामपणे पोहोचला पाहिजे. पारदर्शकता, उत्तरदायित्व, त्वरित कारवाई आणि नैतिक मूल्यांवर आधारित कार्यपद्धती यांच्याच बळावर खाकीचा सन्मान आणि जनतेचा विश्वास कायम राहू शकतो. कारण खाकीची खरी ताकद अधिकारात नसून, जनतेच्या विश्वासात आहे.


SUBSCRIBE
DAINIK YUVAVARTA
YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता


# लोटस इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये आषाढी दिंडी सोहळा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- लोटस इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, वडगावपान येथे आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेला आषाढी दिंडी सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने, टाळ-मृदंगाच्या निनादाने, अभंग, हरिपाठ आणि वारकरी परंपरेचा जागर विद्यार्थ्यांनी साकारल्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

कार्यक्रमाला लोटस इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलचे संस्थापक डॉ. शांताराम निघूते, संचालिका डॉ. निलीमा निघूते, सीईओ श्रीमती वैशाली निघूते, के. एम. बी. एस. निघूते मेमोरियल फाउंडेशनचे संचालक श्री. बाळासाहेब बनोटे, सामाजिक कार्यकर्ते श्री. नितीनभाऊ, संगमनेर साहित्य कला व सांस्कृतिक संघाचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक श्री. रमेश शिंदे, कार्याध्यक्ष, लेखक व होमिओपॅथिक तज्ज्ञ डॉ. विवेक वाकचौरे तसेच उद्योजक, पुस्तकप्रेमी व मराठी लघुपट अभिनेते श्री. राजाभाऊ मांडगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन आणि संतांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत साकारलेली दिंडी, संतांच्या अभंगांवरील नृत्य, हरिपाठ, भारूड आणि विठ्ठल भक्तीपर गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. ज्ञानोबा-तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संतपरंपरेतील समता, सेवा, भक्ती, संस्कार आणि मानवतेचा संदेश आत्मसात करण्याचे आवाहन केले. आधुनिक शिक्षणाबरोबरच भारतीय संस्कृती आणि नैतिक मूल्यांचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. प्राचार्या श्रीमती आशालता शेट्टी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून आषाढी एकादशीचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. उपप्राचार्या सारा रोहम यांनी कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय प्रभावीपणे सांभाळला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक विशाल शेवाळे, कला शिक्षक मोरेश्वर सर, तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वारकरी संस्कृतीचा सुंदर आविष्कार सादर केला.

# दिलीप ढगे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील रंगारगल्ली येथील रहिवासी, निन्हाळी समाजाचे पंच आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिलीप रघुनाथ ढगे (वय ७५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने रंगारगल्ली परिसर आणि निऱ्हाळी समाजात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

दिलीप ढगे यांनी आपल्या हयातीत सामाजिक कार्याला नेहमीच प्राधान्य दिले. एक सच्चे समाजसेवक आणि निऱ्हाळी समाजाचे पंच म्हणून त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला होता. समाजहितासाठी नेहमी तत्पर राहणारे आणि सर्वांशी आपुलकीचे संबंध जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची शहरात ओळख होती. त्यांच्या जाण्याने समाजातील एक सच्चा मार्गदर्शक हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई सत्यभामा रघुनाथ ढगे, भाऊ प्रेमकुमार ढगे, प्रदिप ढगे, संजय ढगे, दोन मुले सागर दिलीप ढगे व नकुल दिलीप ढगे, सूना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# उद्धव ठाकरे यांच्या...

पान १ वरून -

तर घुलेवाडी-निमोण-तळेगाव गटाच्या अध्यक्षपदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विजयभाऊ सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली. याशिवाय कैलास गायके, अनिल खुळे, वाहिद पठाण, रहीम बेग, परवेज शेख, लिंगमूर्ती चिंता, गोरख शिंदे व राजेंद्र आव्हाड यांची उपशहरप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.

महिला आघाडीमध्ये आशाताई केदारी यांची जिल्हा संघटिका प्रभारी, सपनाताई देसाई यांची उपजिल्हा संघटिका प्रभारी, राजश्री वाकचौरे यांची उत्तर विभाग तालुका संघटिका प्रभारी, राजश्री रहाणे यांची पठार भाग तालुका संघटिका प्रभारी, शीतल हासे यांची तालुका संघटिका, वैशाली वडतले यांची घुलेवाडी-सुकेवाडी-गुंजाळवाडी शहरप्रमुख प्रभारी, रेणुका शिंदे यांची संगमनेर पूर्व विभाग शहर संघटिका प्रभारी, आरती मसराम यांची शहर संघटिका, काजल राठोड यांची उपशहर संघटक प्रमुख तसेच आकलापूर येथील गायकर ताई व समुद्रे ताई यांची उपतालुकाप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमास शिवसैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी, अंगीकृत संघटनांचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आरोग्य व दंत तपासणी शिबिर उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - समाजहिताची जाणीव जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या कैलासवासी शंकरराव शेवाळे पाटील प्रतिष्ठानच्या वतीने 'निरोगी विद्यार्थी, उज्ज्वल भविष्य' या संकल्पनेतून जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नर्सरी ते सीनियर के.जी.च्या विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण आरोग्य व दंत तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमात संगमनेर येथील प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. स्वप्निल देवकर व डॉ. सुजित मुळे यांनी विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी केली, तर दंतचिकित्सक डॉ. क्षितिजा राहाणे यांनी विद्यार्थ्यांची दंत तपासणी केली. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची उंची, वजन, शारीरिक स्थिती तसेच दातांची स्वच्छता व वाढ यांची सखोल तपासणी करण्यात आली.

आवश्यक त्या विद्यार्थ्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शनही देण्यात आले. तपासणीदरम्यान डॉ. स्वप्निल देवकर व डॉ. सुजित मुळे यांनी विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार, वैयक्तिक स्वच्छता, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच डॉ. क्षितिजा राहाणे यांनी दातांची योग्य निगा राखणे, नियमित ब्रश करणे आणि तोंडाच्या स्वच्छतेबाबत विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता आनंदाने तपासणी करून घेतली. शिक्षकांनी योग्य नियोजन आणि मार्गदर्शन केल्यामुळे संपूर्ण शिबिर सुरळीत व यशस्वीरीत्या पार पडले. कैलासवासी शंकरराव शेवाळे पाटील प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्वही अधोरेखित झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या शारीरिक आरोग्यालाही तितकेच महत्त्व देणारा हा उपक्रम पालकांच्या कौतुकास पात्र ठरला आहे.

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल, श्री. भाऊसाहेब कारभारी शेटे राहणार प्लॅट नं. १३, समर्थ हाईटस् तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर यांची मालकीची व प्रत्यक्ष कब्जा वहिवाटीची खालील वर्णन केलेली मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णनः जि. अहिल्यानगर ता. संगमनेर गाव/शहरः घुलेवाडी गट नंबर / सर्व्हे नंबर / प्लॉट नंबर: २२४/३४/३५/१८ मधील प्लॉट नं. ०१ वरील प्लॅट नं. १३ क्षेत्रफळ: ६४० चौ.फु. चतुःसीमा पूर्वेसःओपन पेस, पश्चिमेसः प्लॅट नं. १४ दक्षिणेस प्लॉट नं.०२ उत्तरेसः प्लॅट नं. १२ सदर मालमत्तेचे मूळ खरेदी खत (Sale Deed), जे सह दुय्यम निबंधक संगमनेर-२ येथे दिनांक ०१/०३/२०१९ रोजी दस्त नोंदणी क्रमांक ९५५/२०१९ अन्वये नोंदवले गेले होते, ते दिनांक २०/०७/२०२६ रोजी घुलेवाडी परिसर येथे प्रवासादरम्यान किंवा कामाच्या ठिकाणी गहाळ (हरवले) झाले आहे.

याबाबत आम्ही दिनांक २८/०७/२०२६ रोजी शहर पोलीस स्टेशन संगमनेर येथे तक्रार नोंदवली असून, त्याचा मिसिंग रिपोर्ट नंबर ३०२/२०२६ असा आहे. सदर मूळ खरेदी खत गेली आठ दिवस शोधूनही मिळून आलेले नाही. जर सदर मालमत्तेवर किंवा मूळ खरेदी खतावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, गहाणखत, बोजा, लिज, वारसा हक्क किंवा कोणताही वाद असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

सदर मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर मालमत्ता निर्बंध व निष्कटंक आहे असे समजून माझे अशिल पुढील कायदेशीर प्रक्रिया (जसे की दुय्यम प्रत काढणे/मालमत्ता व्यवहार) पूर्ण करतील. दि.२८/०७/२०२६ ठिकाण संगमनेर नोटीस देणार श्री. भाऊसाहेब कारभारी शेटे यांचे तर्फे ॲड. एम. आर. शिंदे, संगमनेर पत्ताः मो. नं. ८८३०४७३३६३ यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.

आपला विश्वासू

ॲड.एम.आर. शिंदे
बी.कॉम, एलएलबी
आनंदनगर, मालदाड रोड, संगमनेर

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
1) NEEDA ALTAP PATEL
NEEDA ALTAF PATEL
(BEFORE MARRIAGE)
NEW NAME
NIDA SUHAIL SAYYED
(AFTER MARRIAGE)


पाहिजेत
क्षितिज इलेक्ट्रीकल
घुलेवाडी, ता. संगमनेर
अनुभवी अकाऊंटट पाहिजे - २ जागा
(पुर्णवेळ)
MS Offics Tally
ज्ञान आवश्यक
- संपर्क -
7007608875

पाहिजेत
मोरया टॉइज व गिफ्ट शॉप
दुकान कामासाठी
होतकरु कामगार पाहिजे
शिक्षण- किमान १० वी
पत्ता- पोफळे मळा, अभंग पेट्रोल पंप समोर
9767880009

पाहिजेत
दुकान कामासाठी
होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

फ्लॅट विकणे आहे
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
- संपर्क -
8788945208
8208223721

पाहिजेत
कापड दुकानासाठी
सेल्समन- २ जागा (पुरूष)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(कामाची वेळ सकाळी १० ते रात्री १०)
(अनुभवास प्राधान्य व आकर्षक पगार)
मेन्स स्टुडिओ
नाशिक-पुणे हायवे लॉ कॉलेज समोर, संगमनेर
8830437076
9822882399

पाहिजेत
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट - १
(महिला)
वेळ - सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
8080548282
7498749500

पाहिजेत
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
- संपर्क -
8888808397









फॅकल्टी पाहिजे
अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI - 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक - पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727

# संगमनेरमध्ये मुद्रांक विक्रेत्यांकडून नागरिकांची पिळवणूक ?

## १०० रुपयांचे मुद्रांक देण्यास नकार, टायपिंगची सक्ती; कारवाईची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अंभोरे - संगमनेर शहरात मुद्रांक विक्रेत्यांकडून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा गंभीर प्रकार कायमच समोर येत आहे. शहरातील पोलीस ठाण्यासमोरील विश्वास, नम्रता आणि मंडलिक या मुद्रांक विक्रेत्यांकडून १०० चे मुद्रांक (स्टॅम्प) थेट विक्रीस नकार देत नागरिकांना त्यांच्या दुकानातच टायपिंग करण्याची सक्ती केली जात असल्याचे एका ग्राहकाने अनुभवले. या ग्राहकाने वाद न घालता थेट प्रसार माध्यमात तक्रार केली आहे. या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ पाटील व तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली आहे.




तक्रारदारास कामगार पतसंस्थेच्या कर्ज प्रकरणांसाठी आवश्यक असलेला १०० रुपयांचा मुद्रांक देण्यास नकार दिला आहे, हे मुद्रांक संबंधित पतसंस्थांच्या कार्यालयातच टायपिंग करून सादर करावे लागतात, त्यामुळे अनेक नागरिक मुद्रांक विक्रेत्यांकडे केवळ कोरे मुद्रांक खरेदी करण्यासाठी जातात. मात्र, संबंधित विक्रेते टायपिंग आमच्याकडेच करून घेतल्याशिवाय मुद्रांक मिळणार नाही, अशी अट घालतात. कोरे मुद्रांक मागितल्यास ते देण्यास नकार दिला जात असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

यामुळे नागरिकांना आवश्यक नसतानाही टायपिंगचे अतिरिक्त शुल्क भरावे लागत असून, आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार, ज्येष्ठ नागरिक तसेच कर्ज प्रक्रियेसाठी येणाऱ्या लाभार्थ्यांना या प्रकारामुळे मनस्ताप सहन करावा लागत आहे.

नागरिकांना मुद्रांक विक्री करताना कोणत्याही प्रकारच्या अतिरिक्त सेवेची सक्ती करणे योग्य नाही. मुद्रांक विक्रेत्यांनी शासनाने निश्चित केलेल्या नियमांनुसार नागरिकांना आवश्यक मूल्याचे मुद्रांक उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. टायपिंग ही स्वतंत्र सेवा असून ती घेणे अथवा न घेणे हा ग्राहकाचा अधिकार आहे. त्यामुळे टायपिंगची अट घालून मुद्रांक विक्रीस नकार देणे हा प्रकार ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित मुद्रांक विक्रेत्यांच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करून नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात कोणत्याही मुद्रांक विक्रेत्याकडून अशा प्रकारची सक्ती होणार नाही यासाठी संबंधित विभागाला स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

संगमनेर शहरात अनेक नागरिकांना या प्रकाराचा सामना करावा लागत असून, प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बेशिस्त वाहन चालकांवर पोलिसांची धडक कारवाई

## ३७ वाहनांवर कारवाई, ३४ हजारांचा दंड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील वाहतूक शिस्तबद्ध आणि सुरळीत करण्यासाठी संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी सुरू केलेली विशेष मोहीम अधिक प्रभावी होत असून, मंगळवारी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३७ लहान-मोठ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत ३४ हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

गेल्या काही काळापासून शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि बाजारपेठांमध्ये बेशिस्त पार्किंग, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. मात्र, पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर वाहतुकीला शिस्त लावण्याचा निर्धार करत सातत्याने विशेष मोहीम राबविण्यास सुरुवात केली. त्याचा सकारात्मक परिणाम आता शहरातील वाहतुकीवर दिसून येत आहे.

मंगळवारी पोलीस निरीक्षक बारवकर स्वतः रस्त्यावर उतरले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार राजेश जगधने तसेच होमगार्ड पठाडे आणि तोरमल यांच्या पथकाने तहसील कार्यालय परिसर, काश्मीर हॉटेल परिसर, पेटीट चौक आणि घुलेवाडी न्यायालय परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविली.

या मोहिमेदरम्यान वाहतुकीस अडथळा ठरणारी वाहने, चुकीच्या पद्धतीने पार्किंग केलेली वाहने तसेच विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३७ वाहनांवर कठोर कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे वाहनचालकांमध्ये नियमांचे पालन करण्याबाबत जागरूकता निर्माण होत असून, शहरातील वाहतुकीतही शिस्त येण्यास मदत होत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि अपघातांना आळा घालण्यासाठी अशा प्रकारची विशेष मोहीम पुढेही सुरू राहणार असून, वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


गुरू पौर्णिमेनिमित्ता...

श्री ज्ञानेश्वरी प्रवचन

प्रसिद्ध ज्ञानेश्वरी निरूपणकार

आचार्य ह.भ.प. अरुण महाराज फरगडे



बुधवार दि. २९ जुलै २०२६ सायं. ६.०० वाजता

ठिकाण - श्री ज्ञानेश्वर मंदिर, चंद्रशेखर चौक, संगमनेर

निमंत्रक - रमेश काका सराफ व परिवार


# राजूरमध्ये मद्यधुंद तरुणांच्या त्रासाविरोधात महिलांची तक्रार

### कारवाईची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील राजूर परिसरात अवैधरित्या मद्यविक्री सुरू असल्याचा आरोप करत मद्यधुंद अवस्थेत दुचाकींवर फिरणाऱ्या तरुणांकडून समाजात अशांतता निर्माण होत असल्याची तक्रार एका सामाजिक संस्थेने गृहमंत्री व जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी महिला संघटनेच्या अध्यक्षा सिंधुबाई पथवे यांनी केली आहे.

राजूर परिसरात दुपारनंतर काही तरुण मद्यप्राशन करून दुचाकींवर फिरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या तरुणांकडून तालमीत व्यायाम करणारे युवक, शालेय विद्यार्थी तसेच गावातील प्रतिष्ठित व्यावसायिक, शेतकरी आणि पत्रकार यांना शिवीगाळ व दमदाटी केली जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गावातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याचा दावा करण्यात आला आहे.

दारू उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहीम राबवून राजूर परिसरात दुपारी चारनंतर मद्यधुंद अवस्थेत दुचाकींवर फिरणाऱ्या तरुणांची तपासणी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीची दखल न घेतल्यास मंत्रालयात जाऊन राज्याचे दारू उत्पादन शुल्क मंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर करण्यात येईल. तसेच संबंधित मद्यपी तरुणांचा बंदोबस्त करण्यासाठी व्यापक कारवाईची मागणी करण्यात येईल, असा इशाराही महिला संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# स्व. वसंतराव देशमुख पत्रकारिता पुरस्कार

## महादेव कुलकर्णी यांना जीवन गौरव



महादेव कुलकर्णी



निलिमा घाडगे

युवावार्ता (प्रतिनिधी)-

श्रीरामपूर - श्रीरामपूर नगरपालिकेच्यावतीने दिला जाणारा ज्येष्ठ संपादक स्व. वसंतराव देशमुख जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाले आहेत. ज्येष्ठ पत्रकार महादेव कुलकर्णी यांना जीवनगौरव, तर मुख्य पुरस्कार अशोक निंबाळकर यांना प्रदान करण्यात येणार आहे.

पालिकेच्यावतीने दरवर्षी हे पुरस्कार प्रदान केले जातात. संगमनेर रोडवरील खा. गोविंदराव आदिक सभागृहात गुरुवार दि. ३० जुलैला संध्याकाळी ४ वाजता हा सोहळा पार पडणार आहे. राज्याचे माजी मंत्री जयंत पाटील आणि माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती आहे, ज्येष्ठ पत्रकार यदू जोशी यांचे यावेळी व्याख्यान होणार आहे. आमदार हेमंत ओगले, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, नगराध्यक्ष करण ससाणे, उपनगराध्यक्ष कांचन सानप, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, शिक्षण मंडळाचे सभापती राजेंद्र पवार उपस्थित राहणार आहेत.

संगमनेर येथील महिला पत्रकार असणाऱ्या निलिमा घाडगे यांना देखील हा पुरस्कार जाहीर झाला आहे. सोबतच दादासाहेब म्हस्के, दिलीप खरात, मच्छिंद्र देशमुख, रियाज देशमुख यांचा देखील या पुरस्कारामध्ये समावेश आहे. पुरस्काराचे हे १४ वे वर्ष आहे. नगरपालिकेच्या अर्थसंकल्पात ३ लाख रुपयांची पुरस्कारासाठी तरतूद करण्यात आली आहे. अशी तरतूद करणारी राज्यातील ही एकमेव नगरपालिका आहे.


चैतन्य हॉस्पिटल

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर



अत्याधुनिक लॅमिनार ऑपरेशन थिएटर

शस्त्रक्रिया

- मेंदुविकार शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्योरोपण
- गुडघा प्रत्यारोपण
- पोटाच्या शस्त्रक्रिया
- किडनी शस्त्रक्रिया
- मुत्रविकार शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
- आतड्याच्या शस्त्रक्रिया

२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी

आर्थिक अडचण आहे का?

काळजी करु नका !

सोनेतारण कर्ज

कमीत कमी व्याजदर

जास्तीत जास्त कर्ज

बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

SMBT BANK

✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे

सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा

- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता


# १९६२ हेल्पलाइन व व्हॉट्सॲप चॅटबॉटमुळे राज्यातील पशुवैद्यकीय सेवा अधिक गतिमान

युवावार्ता (प्रतिनिधी) अहिल्यानगर - राज्यातील पशुपालकांना घरपोच पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या १९६२ हेल्पलाइन व व्हॉट्सप चॅटबॉट सेवेला पशुपालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या सुविधेमुळे घरबसल्या तज्ज्ञ पशुवैद्यकीय डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध होत असून वेळ व प्रवासाच्या खर्चात बचत होत आहे. तसेच पशुधनाच्या आरोग्यात सुधारणा होऊन त्याच्या उत्पादकतेत वाढ होण्यास मदत होत आहे. पशुपालकांना तात्काळ व सुलभ सेवा उपलब्ध करून देणे ही विभागाची प्राथमिकता असून शेतकरी व पशुपालकांनी या सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड आणि इंडसइंड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे जाळे अधिक सक्षम करण्यात येत आहे. माहे जुलै २०२६ मध्ये १९६२ या हेल्पलाइनवर ३५ हजार ६८ पशुपालकांनी संपर्क साधला.


युवावार्ता

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



बजरंग जेडगुले

योगशिक्षक व निसर्गोपचार तज्ञ शिक्षक - संग्राम निवासी मूकबधिर विद्यालय संगमनेर



नोकरीची सुवर्णसंधी

'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

पदे: Field Sales Executive
Business Development Manager

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

पात्रता

* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

सुविधा

आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165








अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या

स्त्रियांच्या समस्या

- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैंथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य



डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )

1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार ISO मानांकन प्राप्त

डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर

www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13



कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist | डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist | डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon | डॉ. सुनिल दिघे Cardiologist | डॉ. फैमुद्दीन शेख Medicine

- सर्जरी विभाग
- अतिदक्षता विभाग
- अपघात विभाग
- डायलिसीस विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- न्यूरोविभाग
- हृदयरोग विभाग
- मेडिसीन विभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- जॉईंट रिप्लेसमेंट
- स्पाईन सर्जरी
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225

४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

**पाईल्सचा कायमचा उपाय !**
**वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?**
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com



**आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा**
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०









# पुण्यात खाकीच दरोडेखोरांच्या कटात !

## एक कोटींच्या दरोडा प्रकरणात दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन



पुणे (वृत्तसंस्था)

पुण्यातील बहुचर्चित एक कोटी रुपयांच्या कथित दरोडा प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिस दलाची प्रतिमा डागाळणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. दरोडेखोरांना मदत केल्याचा आरोप सिद्ध झाल्यानंतर पुणे ग्रामीण पोलिस दलातील पोलीस हवालदार प्रमिला निकम आणि पोलीस नाईक अजित मेस्त्री यांच्यावर निलंबनाची कठोर कारवाई करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सखोल तपासानंतर या दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांचा कटातील सहभाग स्पष्ट झाल्याने खाकीची प्रतिमा मलीन केल्याप्रकरणी त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली.

१८ जुलै रोजी नऱ्हे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवले परिसरात व्यापारी हर्षवर्धन पवार यांच्यावर सुमारे एक कोटी रुपयांच्या दरोड्याचा प्रयत्न झाला होता. या घटनेनंतर तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. तपासात असे निष्पन्न झाले की, तक्रारदाराला खेडशिवापूर पोलीस चौकीत आणल्यानंतर पोलीस हवालदार प्रमिला निकम यांनी कथित पत्रकार आशिष तिवारी याच्या संगनमताने बॅगेतील २० लाख रुपयांची रोकड बाहेर काढण्यास मदत केली. याशिवाय केवळ साडेदहा लाख रुपये अधिकृत मुद्देमाल म्हणून दाखवून संपूर्ण प्रकरण दडपण्याचाही प्रयत्न झाल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे.

तसेच कथित पत्रकार आशिष तिवारीच्या वाहनात ठेवलेली रक्कम सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी प्रमिला निकम यांनी मदत केल्याचेही चौकशीत उघड झाले. या संपूर्ण कटात पोलीस नाईक अजित मेस्त्री यांचीही सक्रिय साथ असल्याचे पुराव्यांवरून स्पष्ट झाल्यानंतर दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. या प्रकरणातील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे, सुरुवातीला संबंधित पोलिस कर्मचारी आणि कथित पत्रकार यांची नावे गुन्ह्यातून वगळण्यात आली होती. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या फेरतपासात नवे पुरावे समोर आल्यानंतर पुरवणी गुन्हा दाखल करण्यात आला आणि पोलिस दलातीलच या गंभीर गैरप्रकाराचा पर्दाफाश झाला.

एकीकडे नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी असलेले पोलिस कर्मचारीच दरोडेखोरांच्या कटात सहभागी असल्याचे समोर आल्याने राज्यभर खळबळ उडाली असून, या प्रकरणामुळे पुणे ग्रामीण पोलिस दलाच्या कार्यपद्धतीवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्यांवर कठोर कारवाई; जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जन्म-मृत्यू नोंदणी प्रणालीतील जुन्या नोंदी केवळ माहिती अद्ययावत करण्यासाठीच कराव्यात. या प्रक्रियेत नावे बदलणे किंवा चुकीच्या पद्धतीने दुरुस्ती करण्याचे प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत. तसेच बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. गुंतागुंत झाल्यानंतर उपचारासाठी रुग्णालयात येणाऱ्या मातांच्या प्रकरणांत वैद्यकीय - कायदेशीर नोंद करणे सक्तीचे असल्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.


जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा कृती दल समितीच्या आढावा बैठकीत त्यांनी या सूचना दिल्या. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती मांडगे, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. संदीप पुंड, महानगरपालिका आरोग्य विभागाच्या डॉ. कविता माने, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुधा कांकरिया, या समितीचे इतर अशासकीय सदस्य तसेच तालुक्यातील वैद्यकीय अधीक्षक व तालुका आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी डॉ.आशिया म्हणाले, जिल्ह्यातील लिंगगुणोत्तर सर्वात कमी असलेल्या ४० गावांची जिल्हास्तरावर स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी. या बैठकीस संबंधित गावांचे ग्रामसेवक, तलाठी आणि आशा सेविका यांना उपस्थित राहण्यास सांगावे. गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यांतर्गत प्रलंबित बैठका तातडीने पूर्ण कराव्यात. तसेच औषध विक्रेते आणि अन्न व



औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनाही पुढील बैठकीस उपस्थित राहण्यासाठी पाचारण करावे, असे त्यांनी सांगितले.

क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत मोहिमेवर अधिक प्रभावीपणे लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. क्षयरोगमुक्त झालेल्या ग्रामपंचायतींचा १५ ऑगस्ट रोजी जिल्हास्तरावर सन्मान करण्यात येणार आहे. मृत्यूचे प्रमाण अधिक असलेल्या तालुक्यांचे भौगोलिक विश्लेषण करावे. रिक्त पदांचा प्रश्न मार्गी लावून माहिती व्यवस्थापनातील त्रुटी दूर कराव्यात. मधुमेहाचे प्रमाण कमी नोंदविलेल्या तालुक्यांनी आकडेवारी अचूक करून आवश्यक सुधारणा कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व रुग्णालयांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त वैद्यकीय दावे सादर करून रुग्णालयांसाठी अधिक निधी उपलब्ध करून घ्यावा. तसेच पारधी समाजाच्या शिधापत्रिका व आधार कार्ड अद्ययावतीकरणाच्या समस्या सोडविण्यासाठी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल, असे डॉ. आशिया यांनी स्पष्ट केले. जन्म-मृत्यू नोंदणीबाबत वैद्यकीय अधिकारी व अधीक्षक यांनी त्यांना निबंधक म्हणून घोषित करण्यात आलेल्या तारखेनंतर घडलेल्या घटनांचीच नोंद घ्यावी.




दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25